॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.११ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत दि. १० ते १२ फेब्रुवारी या कालावधीत प्राध्यापकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वैज्ञानिक उपकरण प्रशिक्षणाचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते झाले.

विद्यापीठांतर्गत दहा संस्थांमधील ३० प्राध्यापकांनी या विद्याशाखा विकास कार्यक्रमात भाग घेतला आहे. प्रा. एस.टी. इंगळे यांनी आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणात विद्यार्थ्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत सक्रीय सहभागी करून घेण्यासाठी विविध धोरणे आणि साधने शिक्षकांना सुसज्ज करीत असतात. त्यामुळे परस्पर संवादी राहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यशाळेत प्रा. संदीप पाटील, प्रा.आर.एस. पाटील यांनी विविध आधुनिक उपकरणांच माहिती व प्रशिक्षण यावेळी दिले. यावेळी सागर पाटील यांनी केसीआयआयएलईची माहिती दिली. या कार्यशाळेत डॉ. योगेश वाघ, डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ. आशुतोष प्रचंड, प्रा.ए. एम. महाजन, डॉ. किरण पवार हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. भूषण चौधरी काम पाहत असून प्रा. मंगल चौधरी, प्रा. स्नेहलता शिरूडे, प्रा. गिरीष चाटे हे यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि ११ फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी